‘‘डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेतील वाङ्मयीन व शैक्षणिक मूल्यांचा चिकित्सक अभ्यास’’

श्री जगदिश प्रसाद झाबरमल टिबरेवाला विद्यापीठाच्या मराठी
साहित्य विभागांर्तगत पी.एच.डी. पदवीसाठी
सादर केलेला (सिनॉपसिस) आराखडा
(मराठी)

• संशोधक •

आंबुलगेकर धोंडिराम दशरथराव

नोंदणी क्रमांक :— १०११०११३

• मार्गदर्शक •

डॉ.माधव राजाराम गवई

मराठी विभाग प्रमुख

श्री जगदिश प्रसाद झाबरमल टिबरेवाला विद्यापीठ,

झुनझुनु, राजस्थान.

सन् २०१२

1. Title of Research - ‘‘डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेतील वाङ्मयीन व शैक्षणिक मूल्यांचा चिकित्सक अभ्यास’’

2. Name of Scholar - Shri Ambulgekar D. Dasharathrao

3. Registration No - 10110113

4. Subject - Marathi

5. Name of Guide - Dr. Madhav R. Gavai

6. Designation - Associate Professor

7. Guide Working Place - Pandit Rajpath Mishra M.Ed Collage, Thane (w)

INDEX

Sr. No.	Topic	Page No.
1	प्रस्तावना (Introduction)	3-5
2	सबंधित साहित्याचा अभ्यास (Review of Related Literature)	5-19
3	प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टये (Objectives of the Research)	19
4	गृहितक / परिकल्पना (Hypothesis)	20
5	संशोधनाची कार्यवाही (Work Plan / Methodology)	20
6	व्याप्ती आणि मर्यादा (Scope and Limitations)	21
7	संदर्भ सूची (Biblography)	21-24

१. प्रस्तावना (Introduction) :— पुर्वपिठिका

विसाव्या शतकातील एक थोर तत्त्वचिंतक आणि युगपुरूष म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. ज्यांनी अखंडपणे पददलित लोकांची सेवा केली, हजारो वर्षे अज्ञान, अन्याय व अत्याचाराला बळी पडलेल्या अस्पृश्य बांधवाच्या मनात आत्मविश्वास निर्माण करून, त्यांच्या हक्कांसाठी संघटितपणे लढा देण्यासाठी बाबासाहेबांनी आपले आयुष्य वेचले. अतिशय बिकट आर्थिक परिस्थिती असताना देखील सहा वर्षात परदेशातल्या सर्वश्रेष्ठ अशा विद्यापीठांतून एम.ए., एम.एस्सी. आणि बार अॅट लॉ हया पदव्या प्राप्त करून अपूर्व विक्रम केला.

अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी कृतिशील अशी चळवळ उभी करून बहिष्कृतांच्या जीवनाला नवा आकार, नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला. आपल्या धारदार लेखणीने आपल्या वृत्तपत्रांमधून अस्पृश्यांची कैफियत मांडून त्यांच्या जीवघेण्या वेदनांना वाचा फोडण्यासाठी निर्भीड प्रयत्न केला व बहुजन समाजामध्ये विचारांची क्रांती घडवून आणली.

सामाजिक चळवळ उभी करताना इथल्या रूढीग्रस्त स्पृश्य लोकांचा विरोध पत्करला धर्मांतरासारखे आव्हान स्वीकारून देशद्रोही, धर्मद्रोही अशा संभावनेकडे दुर्लक्ष करून आपले ध्येय गाठण्यासाठी अनेक यशस्वी प्रयत्न केले. अनेक संकटे आली, परंतु कोणत्याही परिस्थितीत बाबासाहेब डगमगले नाहीत. 'माझ्या समाजास माणुसकीचे सर्व हक्क मिळवून देईन' या एका ध्येयाने प्रेरित होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपला खडतर जीवनप्रवास चालू ठेवला.

'मूकनायक', 'बहिष्कृत भारत' व 'जनता' या त्यांच्या मराठी वृत्तपत्रांनी लोकसेवेचे व्रत स्वीकारून आपले अस्पृश्योद्धाराचे कार्य सुरू ठेवले. पत्रकाराकडे असलेली स्वमत प्रतिपादन शक्ती, निर्भीडपणे सत्य मांडण्याची ताकद व सर्वसामान्यांच्या प्रश्नांचा ऊहापोह करण्याचे धैर्य असे चांगल्या पत्रकाराला आवश्यक असलेले सर्व पैलू डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या पत्रकारितेत दिसून येतात.

डॉ. बाबासाहेबांना जीवनात अनेक संघर्ष करावे लागले. हे संघर्ष करताना त्यांची वैचारिक भूमिका घडत गेली. त्यांचे वैयक्तिक जीवन आणि त्यांची वैचारिक जडणघडण यांचा अविभाज्य संबंध आहे. म्हणून बाबासाहेबांचे वैचारिक योगदान स्पष्ट करताना त्यांच्या चरित्रातील महत्त्वाच्या घटनांचाही आढावा घ्यावा लागतो.

डॉ. आंबेडकर यांचे बालपण आणि शिक्षण :—

स्वतंत्र भारताला लोकशाही स्वरूपाचा राज्यघटना प्रदान करणारे घटनेचे शिल्पकार डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी महू (मध्यप्रदेश) इथे झाला. बाबासाहेब अवघे सहा वर्षांचे असतांनाच त्यांच्या आई भीमाबाई मरण पावल्या. पुढे बाबासाहेबांचा सांभाळ त्यांचे वडील रामजी व आत्या मीराबाई यांनी केला. बाबासाहेबांचे प्राथमिक शिक्षण सातारा व मुंबई या ठिकाणी झाले. बाबासाहेबांच्या घरची परिस्थिती अत्यंत गरीबीची होती त्यांचे वडील सैन्यात सुभेदार होते. परंतु वडील निवृत्त झाल्यानंतर त्यांना अतिशय दारिद्रयात दिवस काढावे लागले.

मुंबईमध्ये डेव्हलपमेंट डिपार्टमेंटच्या चाळीत दहाबाय—दहाच्या खोलीत तीन भावंडे, आत्या व वडील यांच्यासह बाबासाहेब राहत होत. एका पैशाच्या घासलेट तेलावर अभ्यास करत होते. अस्पृश्यतेचे दाहक चटके सोसून उपाशीपोटी राहून अनेक हालआपेष्टा, अडचणी यांना धैर्याने व जिद्दीने तोंड देऊन बाबासाहेबांनी आपले पीएच. डी. व बॅरिस्टर पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले.

बाबासाहेब अस्पृश्य समाजाचे असल्याने या अस्पृश्यतेची भीषण जाणीव त्यांना बालवयातच झाली. अनेक विचित्र प्रसंग त्यांच्या अनुभवास आले. कोरेगावला आले. कोरेगावला जात असताना महाराची पोरे म्हणून त्यांना गाडीवान मिळाला नाही. जादा भाडे देऊन गाडीवान मिळविला पण वाटेत पाणी पिण्यास मिळाले नाही. शेवटी नाल्याचे पाणी पिऊन त्यांना तहान भागवावी लागली. शाळेमध्ये शिकत असतानाही असाच कटू अनुभव आला. महाराचे पोर म्हणून पाणी पिण्यास मिळत नसे. वर्गाच्या बाहेर गोणपाटावर बसावे लागे. स्पृश्य मुले त्यांना शिवून घेत नसत. अस्पृश्यतेचा हा दाहक अनुभव बाबासाहेबांनी बालपणातच अनुभवला होता.

एकदा बाबासाहेब स्पृश्य हिंदूंच्या पाणवठयावर पाणी पिण्यास गेले असता स्पृश्य हिंदूंनी बाबासाहेबांना खूप मारले. शाळेमध्ये, समाजामध्ये, अवतीभोवतीच्या वातावरणामध्ये प्रत्येक क्षण बाबासाहेबांना अस्पृश्यतेचा वाईट अनुभव येत होता. आपल्याला वर्गात इतर मुलांबरोबर बसू दिले जात नाही, स्पृश्य मुले आपल्याला शिवून घेत नाहीत, प्रत्येक गोष्टीत आपला स्पृश्य हिंदूंना विटाळ होतो, असे का ? तर आपण 'महार' जातीचे आहेत म्हणून, आपण 'अस्पृश्य' आहेत म्हणून. या विचाराने बाबासाहेबांना अतिशय दु:ख होई. सर्वसामान्य महारांना या दैनंदिन जीवनाचे

फारसे सोयरसुतक नव्हते. परंतु बाबासाहेबांचे जिज्ञासू मन मात्र बालवयातही या वेगळया व विदारक सत्याची उकल करण्यासाठी धडपडत होते.

बाबासाहेबांना लहानपणापासूनच वाचनाची आवड होती. अभ्यासाशिवाय त्यांचे इतर वाचन चालूच असायचे. इतर पुस्तकांसाठी ते नेहमी वडिलांकडे हट्ट करायचे. बाबासाहेबांचे वडीलही मोठे व्यासंगी गृहस्थ होते. बाबासाहेबांचे पुस्तक वाचण्याचे वेड लक्षात घेऊन बाबासाहेब सांगतील ती पुस्तके ते आणून देत.

दलितांचा उद्धारकर्ता, मानवमुक्तीचा रक्षक, लोकशाही राज्यघटनेचा शिल्पकार, धर्माची खरी व्याख्या लोकांना पटवून सांगणारा लोकशिक्षक... या सर्वच नात्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय इतिहासात अलौकिक असे स्थान प्राप्त झाले. कठीण परिस्थितीशी आपल्या ज्ञानाच्या जोरावर व आत्मविश्वासाच्या बळावर झगडा करून त्यांनी एक नवी लोकशाही निर्माण केली. भारतीय संस्कृती टिकविण्यासाठी, खऱ्या नीतीमूल्यांची जोपासना करण्यासाठी सगळे आयुष्य त्यांनी पणाला लावले. त्यांच्या या कृतींतून खरा देशभक्त आपल्यासमोर येतो.

खंडप्राय भारतासारख्या देशातील मोठया जनसंख्येचा समुह विकासापासून वंचित राहिल्यामुळे जागतिक पातळीवर भारतासारख्या देशाला अपमानकारक होते, मानवतेला काळीमा फासणारे होते. त्याकरिता डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या समाजाला न्याय व हक्क देणे अत्यावश्यक समजून या अस्पृश्य समाजाचा न्याय हक्कासाठी संघर्ष उभा केला. या समाजाच्या अस्मीतेसाठी, लढाईसाठी एक सर्वव्यापी आंदोलन (चळवळ) उभे केले आणि त्या आंदोलनाचे नेतृत्व स्वत: स्वीकारले. या तमाम अस्पृश्य समाजाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांसारखे विद्वान, चरित्र्यसंपन्न आणि नि:स्वार्थ नेतृत्व लाभल्यामुळे ही स्वाभीमानाची लढाई योग्य दिशा घेऊन पुढे जात राहिली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ही दलित उद्धाराची चळवळ उभी केली त्यात विविधांगीपणा होता. याच चळवळीचे ''पत्रकारिता'' हे एक म्हत्वाचे अंग होते जे जाणिवपूर्वक दुर राहिले होते. पत्रकारितेच्या इतिहासात हा भाग उपेक्षित राहिला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या वृत्तपत्रातून विविध विषयावर जे लेखन केले ते अत्यंत प्रभावी व चिंतनशिल होते. त्याचा आढावा घेणे संशोधकाना गरजेचे वाटले म्हणून नवभारत निर्मितीच्या क्रांतीकारी कार्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेचे योगदान आहेच ! ते त्रिकालाबाधित सत्य आहे. ते कोणीही नाकारू शकत नाही.

२. **संबंधित साहित्याचा अभ्यास (Review of Related Literature) :-**

१. **आगलावे प्रदीप – 'समाजशास्त्रज्ञ डॉ.बाबासाहेब आंबेडकर'**

प्रकाशन – सुगावा प्रकाशन २००१

सदरील ग्रंथातून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा सामाजिक दृष्टकोन काय आहे. समाजाचे परिवर्तन करण्यासठी शिक्षण हे माध्यम कसे प्रभावी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारचे विविध पैलू होते. त्यापैकीच बाबासाहेबांचा सामाजिक विचार याठिकाणी मांडलेला आहे.

२. **आनंद, 'भगवान बुध्द'**

प्रकाशक – समृध्द भारत प्रकाशन, मुंबई

मराठी आवृत्ती – डिंसेबर २००३, मार्च २००४

बौध्द वाङ्मय म्हणजे महासागर आहे. एवढे प्रचंड आणि तपशीलवार वाङ्मय अन्य कोणत्याही धर्मावर अथवा विषयावर निर्माण झाले नाही. सदर ग्रंथात सुध्दा बुध्दाचे जीवन, धम्माचे सार आणि आदर्श बौध्दजनाची दिनचर्या तसेच जीवनक्रम याबाबी संक्षिपत आणि सोप्या भाषेत मार्गदर्शन करणारी पुस्तीका आहे.

३. **अहिर डी.सी. – 'लोकराज्य धम्मचक्र प्रवर्तन सुवर्ण महोत्सव विशेषांक'**

प्रकाशन – माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र शासन

आवृत्ती – प्रथम २००६

'डॉ. आंबेडकर आणि भारतातील बुध्द धम्माची चळवळ' या लेखात ज्या दीक्षाभूमीवर १४ ऑक्टोबर १९५६ रोजी बाबासाहेब आंबेडकरांनी धम्मदीक्षा घेतली आणि आपल्या लाखो अनुयायांना बुध्दाच्या मार्गावर चालण्याचे आवाहन केले ती दीक्षाभूमी बौध्दांचे पवित्र तीर्थक्षेत्र बनले. आज हजारो लाखो लोक तिथे नतमसतक कसे होतात हे झालेले परिवर्तन सदरील लेखात मांडले आहे.

४. **कदम अविनाश – 'सडक नाटक'**

प्रकाशन – प्रकाश विश्वासराम लोक वाङ्मय, मुंबई

आवृत्ती – प्रथम डिंसेबर २००५

सदर ग्रंथात दोन भाग केलेले आहेत पहिल्या भागात सडक नाटक हा साहित्य प्रकार जीवनवादी कलाप्रकार आहे व सडकनाटकाचे नाटय तंत्र त्याचा

इतिहास व ही परंपरा जोपासण्यासाठी आपल्याला काय केले पाहिजे. आज सडकनाटकाची काय स्थिती आहे आणि उद्या बदलत्या काळातही सडकनाटकाचे काय स्वरूप असणार आहे. या संदर्भाचे विवेचन आले आहे. दुसऱ्या भागात प्रत्यक्ष सडकनाटकांच्या निवडक संहिता घेतलेल्या आहेत. थोडक्यात सडकनाटकाची परंपरा चळवळीने टिकवून ठेवली आहे असे आपणास सांगता येईल.

५. कहाऱ्डे सदा — 'दलितसाहित्य चिकित्सा'
प्रकाशिका — उषा मुलाटे
स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद
आवृत्ती — प्रथम जून २००१

यांनी आपल्या या ग्रंथातून सुरूवातीलाच दलित चळवळींचा परामर्श घेऊन दलित साहित्याची परंपरा फुले आंबेडकरी चळवळीचा प्रभाव कविता, कथा, कादंबरी आत्मकथन नाटक व वैचारितक वाङ्मय इ. साहित्य प्रकारांची चिकित्सा करून दलित साहित्याला योग्य न्याय दिला आहे. त्याचबरोबर शेवटी मार्क्सवादी साहित्य व दलित साहित्य याची तुलनाही केलेली आहे.

६. कांबळे अरूण, 'संपादक — जनता पत्रातील लेख'
प्रकाशन — पॉप्युलर प्रकाशन, मुंबई व मुंबई विद्यापिठ मराठी विभाग
आवृत्ती — प्रथम (१९९२)

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत भारत असे नाव बदलून 'जनता' असे ठेवून वृत्तपत्र चालविले त्यातील लेखासंदर्भात लेखक असून कांबळेंनी आपले मत मांडून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जनतेमधील लेखांचा आढावा घेतला आहे.

७. कांबळे भिमराव —'सम्राट महापरिनिर्वाण विशेषांक'
प्रकाशन — सम्राट पब्लिकेशन प्रा. लि, दादर, मुंबई
आवृत्ती — प्रथम २००४

'बाबासाहेबांनी आम्हाला काम दिले ?' या लेखात लेखकांनी बाबासाहेबांनी आम्हाला मानाने वाटचाल करण्याचे सामर्थ्य दिले, मानवी स्वातंत्र्याचा अर्थ समजावून सांगितला, मानवी संस्कृतीला इतिहासाचे नवीन पान दिले. बुध्द, धम्म

आणि संघाचा पावनघोष या भूमित रूजत निवादत ठेवण्याचे महाकार्य केल्याचे सविस्तर सांगितले आहे.

८. **कांबळे शांताबाई कृष्णाजी – 'माज्य जल्माची चिन्तरकथा'**
प्रकाशन – उषा वाघ, सुगावा प्रकाशन, पुणे
आवृत्ती – ३री ११ मे १९९८

सुवर्णानी चालवलेला छळवार संपावा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार व त्यांची शिकवण यांच्याशी पुरे इमान राखणारे हे आत्मचरित्र एकमेव असल्याचे जाणवते. खऱ्या अर्थाने धर्मांतरा मागची भूमिका काय होती ? या व अश्या अनेक प्रश्नांची उत्तरांचा उकल होतो.

९. **कांबळे सविता – 'शिक्षण संवेदन'**
प्रकाशन – धम्म प्रबोधिनी प्रकाशन, कल्याण, मुंबई
आवृत्ती – प्रथम जुलै / ऑगस्ट २०१०

'डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि भारतातील बुध्द धम्माची चळवळ' या लेखात डॉ.आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव संपूर्ण देशावर कसा पडत असे. त्यातल्या त्यात उत्तर भारत व दक्षिण भारत फार आधीपासूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रभावित होता. अनेक नगरांमध्ये, महानगरांमध्ये जिल्हास्तरावर बुध्द धम्मदिक्षा समारंभ आयोजित करण्यात आलेले आहेत. आज तर अनेक राज्यात धम्माची चळवळ वाढतच आहे. त्याचबरोबर भारतात अनेक सुंदर बुध्दविहारांची संख्या मोठया प्रमाणात वाढत आहे. अनेक जाती जमातींचे लोक आता बौध्द धम्म स्विकारत आहेत. हेच डॉ.आंबेडकरांचे यश आहे. असा सकारात्मक विचार लेखिकेने मांडला आहे.

१०. **कोनाळे विश्वनाथ मारूती – 'चार वांर कापड'**
प्रकाशन – महारूद्र मंगनाळे, मुक्तरंग प्रकाशन, लातूर
आवृत्ती – प्रथम ८ सप्टेंबर २००७

या ग्रामीण भागातील दलित समाजाचे वास्तववादी चित्रण करणाऱ्या पुस्तकात दारिद्र किती वाईट असते आणि या दलित समाजाच्या दारिद्रयात कित्येक पिढया न पिढया जगत आहेत. किती दुर्लक्षित आहेत ?

उच्चवर्णीयांना अस्पृश्यांना कसे पायदळी तुडवतात ? परंपरेनी अस्पृश्यांचे माणूसपण कसे नाकारले या बाबींचे भदेक वर्णन आलेले आहे.

११. कोळसे पाटील बी.जी — 'सम्राट महापरिनिर्वाण विशेषांक'
प्रकाशन — सम्राट पब्लिकेशन्स प्रा. लि., दादर, मुंबई
आवृत्ती — प्रथम (२००४)

स्वतंत्र भारतातील राजकारण श्रमजीवांचे प्रलंबित प्रश्न' या शिर्षकाखाली लेखकांनी देशाच्या राजकारणाचा विचार करतांना देशातील सर्व पक्ष भारतीय राज्य घटनेशी बांधिलकी सांगतात. समाजवाद धर्मनिरपेक्षता लोकशाही व सार्वभौमत्व ही चार मूलतत्वेच भारतीय राज्यधटनेचा पाया आहेत. थोडक्यात समता हाच घटनेचा पाया आहे. तथापि स्वातंत्र्योत्तर काळात कोणत्याही राजकीय पक्षाने या तत्वाचा पाठपुरावा केलेला दिसत नाही. हाच विचार मांडला आहे.

१२. गिमेकर परशुराम — 'मराठवाडयातील दलितांचे लोकसाहित्य'
प्रकाशन — के.एस.अतकरे कैलाश पब्लिकेशन्स
आवृत्ती — प्रथम मार्च २००४

या ग्रंथात मराठवाडयातील दलितांचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, कौटुंबिक, राजकीय व सांस्कृतिक जीवन, दलित स्त्री—पुरूषांची ओवीगीते, लोकगीते, आंबेउकरी गीते त्याचबरोबर दंतकथा, वीरकथा हास्यकथा, अद्‌भुतकथा, उखाणे, वाक्‌प्रचार व म्हणी या सर्व घटकांचा अभ्यास केला गेला आहे.

१३. चंदनशिव सुनिल, 'मराठी दलित कविता : एक चिकित्सक अभ्यास'
प्रकाशक — सौ. नम्रता मुळे,
डिम्पल पब्लिकेशन, ठाणे
आवृत्ती — प्रथम ६ डिंसेबर २००५

चंदनशिव यांनी दलितसाहित्याताच्या अनेक कवितांचा परामर्श घेतला आहे. विशेषत: आंबेडकर वादांच्या मूल्यांची पाठराखण करणाऱ्या आणि स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि विज्ञान निष्ठतेची अवधी सुत्रे काव्यत्मकतेला ठकान लावता कवी कलांवत कार्यकत्यांच्या मनाची उकल करण्याचे महत्कार्य केले आहे.

१४. **चढ्ढा सविता — 'हिंदी पत्रकारिता सिध्दांत और स्वरूप'**

प्रकाशन — तक्षशीला प्रकाशन, दिल्ली

आवृत्ती — प्रथम १९९५

केसरीने स्वातंत्र्य लढयात मुख्य चालकाची भूमिका घेतली. त्याचवेळी मदन मोहन मालविथ यांनाही दैनिक 'हिंदुस्थान' नावाचे वृत्तपत्र काढले. पंडित मोतीलाल नेहरूंनी 'लिडर'चे अध्यक्षपद स्विकारून ते चालविले. प्रेरणेतून 'पंजाब', 'वंदेमातरम', 'पीपुल' इ. पत्रे लाहोरमधून निघाली. महात्मा गांधीनी अधिकेत असताना 'इंडियन ओपिनियन' नावाचे वृत्तपत्र काढले. अशी अनेक वृत्तपत्र हिंदीतही निर्माण झाले होते.

१५. **जाधव मधुकर — 'परिवर्तन'**

प्रकाशन — अजिंक्य दादा गोरे

गोदा प्रकाशन, औरंगाबाद

आवृत्ती — प्रथम (२००८)

ग्रामीण भागातला बेरोजगार युवकाली ही कथा आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या 'शिका' या मुलमंत्रानुसार आपल्या मुलांना शिक्षण देतो. स्वत:ला पायावर उभा करतो. या जीवन संघर्षाची कथा या पुस्तकात मांडली आहे. शिक्षण आणि त्यातून होणारी प्रगती ही स्वत:साठी कुटुंबासाठी की समाजासाठी हा प्रश्न त्यांनी या कांदबरीतून मांडला आहे.

१६. **ठकार निशिकांत — 'साहित्याचे परिघ'**

प्रकाशक — सौ. उषा मुलाटे,

स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद

आवृत्ती — प्रथम २६ एप्रिल २००१

लेखक निशिकांत ठकार यांनी आपल्या ग्रंथातून साहित्याचे परीघ या संदर्भात विवेचनात्मक सांगतात की परिघ म्हणजे साहित्याच्या लक्ष्मणरेषा नव्हते. कलाक्षेत्रातील रेषा म्हणजे. नियम, रूढी, रूपाकार संकेत चौकटी ओलांडण्यासाठीच असतात. साहित्यकृती याचा पुनर्रविचार करायला भाग पाडते. परिघाची कल्पना केंद्र कल्पनेशिवाय संभवत नाही. साहित्य समिक्षेत

निर्माण होणाऱ्या प्रश्नांची उत्तरे कधीच पूर्ण हो शकत नाहीत. या अनुशंगाने साहित्य समिक्षा लेखकांनी केलेली आहे.

१७. ढसाळ नामदेव, 'हाडकी हाडवळ'

प्रकाशक — शब्द पब्लिकेशन, बोरीवली, मुंबई

आवृत्ती — ३ री — डिंसेबर २०१०

समाजाचे वास्तव दर्शन घडवलेले आहे. महाराष्ट्राच्या ६० वर्षापूर्वीचे विश्व लेखकांनी उभं केलं आहे. खेडयातील महार समाजाची 'हाडकी हाडवळा'ची वर्तनी जमात सर्वांमधील लबाड कारस्थानांनी आधीच लुबाडलेली आहे. बायजाचा नवरा पोटापाण्यासाठी मुंबईला असेन ती आपले शील आणि पोरंगे सांभाळीत प्रसंगी आलेली महारकीची काठीदेखील मोठया कष्टाने चालवित आहे. खेडयातील गावगाडयाने रूढी व परंपरेनुसार चालविलेले अस्पृश्यांचे भयानक शोषण प्रस्तुत कांदबरीच व्यक्त झाले आहे.

१८. दाढेल मारोती — 'कारकोदवा'

प्रकाशक — सौ. नम्रता मुळे,

डिम्पल पब्लिकेशन, ठाणे

आवृत्ती — प्रथम ६ डिंसेबर (२०१०)

'कारकोदवा' हे मारेती दाढेल यांचे आत्मचरित्र व त्यातले वेगळेपण असे की दाढले यांचे शिक्षण फक्त पाचवीपर्यंत झालेलं तरीही साहित्याच्या चौकटीत बसणारे आत्मचरित्र लिहिले. जीवनात आलेले विविधंगी अनुभव त्यांनी कश पध्दतीने घेतलेले याची प्रचिती कारकोदबांचे एकएक पान देत जाते. आपली चित्रकथा शब्दबद्ध करतांना निसंकोचपणे आपले वास्तव जीवन उभे केले आहे.

१९. देशमुख मा.मु — 'बहुजन समाज आणि परिवर्तन.'

प्रकाशन — सौ.मजुंश्री देशमुख

शिवभारती प्रकाशन, नागपूर

आवृत्ती — प्रथम १९९६

बहुजन समाजाच्या परिवर्तनासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेल्या क्रांतीकार लेखनांचा प्रभाव कसा झाला ते सांगून बहुजन समाजाला लेखकाच्या गर्ततून काढण्याच्या विचार सांगितला.

२०. पतंग रमेश — 'राज्यघटना आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर'

प्रकाशन — भारतीय विचार साधना प्रकाशन, पुणे

आवृत्ती — प्रथम २ फेब्रुवारी २००५

भारतीय राज्यघटना किती सर्वसमावेशक आहे. काही समाजकटकांनी कितीही घटनेवर टिका किंवा बदलाविषयी प्रयत्न केला तर ते अशक्य प्राय आहे. डॉ.बाबासाहेबांनी छानना निर्मितीत कोणकोणाचे काय योगदान आहे ही काही एका व्यक्तीचा विचारांची मक्तेदारी नाही असा विचार मांडला व सर बी. एन.रॉय यांचेही या कामी काय योगदान आहे या संदर्भातला विचार लेखकांनी मांडून लोकांच्या गैरसमजाचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला आहे.

२१. पवार ज. वि — 'सम्राट महापरिनिर्वाण विशेषांक'

प्रकाशन — सम्राट पब्लिकेशन्स प्रा.लि., दादर, मुंबई

आवृत्ती — प्रथम (२००४)

बाबासाहेबांची कायदेशीर लढाई या शिर्षकाखाली लेखकांनी सांगितले की, अस्पृश्यांना सवर्णाकडून अतिप्राचीन काळापासून मज्जाव करणे, त्यांना गुलामीत ठेवणे हे सिध्द करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कोर्टात खटला चालवला व कोर्टाचा निर्णय अबाधीत ठेवण्यात आला. दि. १७.०३.१९३९ म्हणजे दहा वर्षे कायदेशीर लढाई करून अखेर निर्णय बाबासाहेबांसारखा झाला.

२२. पवार सुधाकर ,'पत्रकारितेची मूलतत्वे'

प्रकाशक – अनिरूध्द अनंत कुलकर्णी

कॉन्टिनेन्टल प्रकाशन विजयनगर, पुणे

आवृत्ती – दुसरी (२००६)

वृत्तपत्रविद्या किंवा पत्रकारिता या विषयाचे महत्व लक्षात घेऊन लेखकांनी सदर पुस्तांतून वृत्तपत्राच्या निर्मितीपासून ते स्वरूप विश्लेषणा पर्यंतचा भाग सांगून वृत्तपत्रांची कायदेशीर चौकट काय आहे याही बाबींचा सविस्तर उल्लेख केला आहे. भारतीय वृत्तपत्र सृष्टीची व्यापकता व आचारसंहिताही सांगितली आहे.

२३. पानतावणे गंगाधर – 'पत्रकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर'

प्रकाशन – प्रतिभा प्रकाशन, पुणे

आवृत्ती – दुसरी १९९६

डॉ.गंगाधर पानतावणे यांनी सदर ग्रंथातून बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेचा चिकित्सा करून सांगतांना म्हणतात की, तत्कालीन विरोधक बाबासाहेबांवर टिका करताना निराकरण बेसुमार बोलतात व लिहितात तशा भरमसाठ लिहिण्या बोलण्यातून अस्पृश्यांचा काडीचाही नफा न होता तोटा मात्र होईल. अस्पृश्यांच्या पुढाऱ्यांनी त्यांचा जाहिर त्याग करून अस्पृश्यांच्या चळवळीला येणारा अडथळा ताबडतोब बंद करावा. असा ही टोकाचा विरोध बाबासाहेबांना झालेला आहे.

२४. बेडेकर दि.के – 'निर्मिती व समीक्षा'

प्रकाशन – प्रकाश विश्वासराव

लोकवाङ्मय गृह मुंबई

आवृत्ती – सहावी २००८

सदर ग्रंथाचे दोन भाग पडतात. पहिल्या भागात सद्य प्रकरणात म्हणजे ७५ पानात तात्वीक चर्चा आहे. दुसऱ्या भागातील पाच प्रकरणात, म्हणजे पुढील ७६ पानांत प्रत्यक्ष समिक्षणे आहेत. दोन्ही भागात साहित्य निर्मिती व संमिक्ष संदर्भात विवेचन आले आहे. भारतीय साहित्य शास्त्राज्ञाद्वारे मांडलेल्या 'रस', 'भाव', 'ध्वनी' इ. शास्त्रीय प्रज्ञेचे संदर्भात साहित्य समिक्षेचया प्रांतात गौरव होणे

गरजेचे आहे. त्याचबरोबर कलाकृती म्हणजे काय ? ती कशी निर्माण केली जाते या संदर्भातही विचार झालेली आहे.

२५. **बोराडे रा.रं — 'ग्रामीण साहित्य'**

प्रकाशन — बाबा मांड, साकेत प्रकाशन, औरंगाबाद

आवृत्ती — प्रथम १९९२

सदर ग्रंथात काही लेख ग्रामीण साहित्याच्या निर्मितीशी तर काही लेख ग्रामीण साहित्य चळवळी संदर्भात आहेत. काही लेख लेखकांच्या इतर ग्रामीण साहित्य निर्मितीशीह निगडीत आहेत. अलीकडच्या काळात ग्रामीण भागात साहित्याची चळवळ झपाटयाने फोपावत आहे. तालूका किंबहूना गावातही साहित्य जागृती होत असतानां दिसते. ग्रामीण साहित्य चळवळीत ग्रामीण रंगभूमि, ग्रामीण साहित्यातील ग्रामीण स्त्रीचे चित्रण वेगवेगळे साहित्यिक करतात उदा. शंकर पाटील, उध्दव शेळके, मधु मंगेश कर्णीक यांच्या कथांचाही मागोवा घेऊन ग्रामीण साहित्याचे स्वरूप सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

२६. **मनोहर यशवंत, 'समाज आणि साहित्य समीक्षा'**

प्रकाशक — उषा वाघ,

सुगावा प्रकाशन, पुणे

आवृत्ती — प्रथम ६ डिंसेबर १९९२

यांनी प्रस्तुत ग्रंथात पारंपारिक साहित्य समिक्षेला छेद देवून ज्या साहित्याकडे कूयकामी साहित्य म्हणून ब्राह्मणवादी साहित्यिक पाहातात त्या दलित ग्रामीण व आदिवाशी साहित्याची उपयोगीता स्पष्टपणे मांडली 'सौदंर्य' हे समाजाशी त्यातील नैतिक मूल्याशी निगडीत नसते. असा वस्तूस्थितीचा घोर विध्यर्यास करणाऱ्या समिक्षेपेक्षा फारच वेगळया प्रकारची वस्तुस्थितीला प्रमाण मानून डॉ.बाबासाहेबांच्या विचारांनी प्रमाणित झालेल्या साहित्याची समिक्षा केली.

२७. **मुलाटे वासुदेव – 'ग्रामीण कथा : स्वरूप आणि विकास'**

प्रकाशन – सौ.उषा मुलाटे

स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद

आवृत्ती – दुसरी ऑगस्ट २००५

सदर ग्रंथात अभ्यासाला घेतलेला कथा वाङ्मय (१९९६ ते १९७५) या कालखंडातला आहे. सन १९४६ नंतर मराठी ग्रामीण कथा अनेक अर्थानी बदलेली. अनेक दिशांनी तिच्यात परिवर्तन झाले. असा परिवर्तनाची नोंद विस्ताराने घेतली आहे. त्या दरम्यान कथा निर्मितीच्या प्रेरणा तिच्यातील जाणिव व तिचे स्वरूप आणि दरम्यान ग्रामीण कथेवर झालेला परिणाम सविसतर घेतला आहे. ग्रामीण भागातील झालेल्या भौगोलीक, सांस्कृतिक, सामाजिक झालेल्या बदलात घडलेला माणूस आणि त्याचे मन तत्कालीन कथेत चितारले आहे.

२८. **मुणगेकर भालचंद्र – 'लोकराज्य धम्मचक्र प्रवर्तन सुवर्ण महोत्सव विशेषांक'**

प्रकाशन – माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र शासन

आवृत्ती – प्रथम २००६

'आर्थिक विकास व सामाजिक न्याय या लेखात डॉ.भालचंद्र मुणगेकर यांनी भारतदेश एक सार्वभौम, लोकशाही प्रजासत्ताक बनल्यानंतर देशात बांधिलकी, स्वातंत्र्य, समता, बंधुभान आणि सर्वांसाठी समान न्याय या तत्वांशी बांधील आहे व देशातल्या सामान्य जनतेच्या उन्नतीसाठी राज्यसंस्थेनी, विविध योजना राबवून लोकांचा आर्थिक स्वर व सामाजिक स्थर उचांवला पाहिजे.

२९. **मून वसंत – 'फुले आंबेडकर संशोधनातील प्रदुषणे'**

प्रकाशन – सुगावा प्रकाशन, पुणे

आवृत्ती – प्रथम १९९३

महात्मा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संदर्भात हल्ली अनेकजन संशोधन करत आहेत म्हणून लेखकांनी यातून त्या काळात या महापुरूषांनी समाजला मार्गदर्शन करीत असतांना त्या परिस्थितीची पार्श्वभूमि संशोधकाच्या डोळयासमोर असणे गरजेचे आहे. अन्यथा संशोधन किंवा तत्संबधी लेखन वाचकांची दिशाभूल करणारे ठरेल असा विचार मांडला.

३०. मिस्कीटा नाझरेथ, 'बाबुराव बागूल यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास'

प्रकाशक — सौ. नम्रता मुळे,

डिम्पल पब्लिकेशन, ठाणे

आवृत्ती — प्रथम १ मे २००६

यांनी बाबुराव बागुलांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्लयास या ग्रंथात बागुलांचे कथालेखन, कांदबरी, कविता, संपादक म्हणून प्रतीत झालेल्या त्यांच्या विविध पैलूंचा परामर्श घेतला आहे. त्यातील विचारवैभव, मानवी स्वभाव लेखन चिंतन परता आणि धर्म, अर्थ, इतिहास, समाज या सर्वांगाचा विचार झालेला दिसतो.

३१. मेश्राम केशव, 'अनाहत'

(संपादित)

प्रकाशक — सौ. नम्रता मुळे,

डिम्पल पब्लिकेशन, ठाणे

आवृत्ती — प्रथम — २००५

साधारणतः इ.स.१९६०च्या दशकात नावारूपाला आलेल्या स्त्री लेखिका मोहिनी वर्दे यांची पहिली कथा १९६० साली 'महाराष्ट्र टाईम्स' मध्ये आलेली होतील. मराठी साहित्यात स्त्रीयांच्या कथा असा मोहिनी वर्देच्या माध्यमातून सुरू झाला याच प्रवाहातल्या एका स्त्रीलेखिका मोहिनी वर्देच्या कथा प्रा. केशव मेश्राम यांनी संपादन करून एकूण चौदा कथा या पुस्ताकंत आहेत. यातल्या सर्वच्या सर्व कथा उल्लेखनिय आहेत. 'पैंजण', 'स्वीकार', 'मधुरस' आणि 'शिल्प' या कथांच्या आशय गर्भातून कलासक्तीचा अखंड प्रवाह सातत्याने खळखळताना आढळून येतो.

३२. मोरे सदानंद — 'साप्ताहिक सकाळ'

प्रकाशन — सकाळ पेपर्सचे प्रकाशन, अंक ४८

आवृत्ती — प्रथम १४ सप्टेंबर २००२

डॉ. सदानंद मोरे यांनी 'लोकमान्य ते महात्मा' या लेखाच्या शिर्षकाखाली सांगतात की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लेखनांची प्रेरणा ही महात्मा फुले असल्यामुळे बहुजनवादी विचारच मांडला. त्याच दरम्यान कम्युनिष्ठांनी चळवळ सुरू असतांना डॉ.बाबासाहेबांनी कम्युनिष्ठ विचारवत्तांच्या लक्षात आणून दिले

की जाती विषमता निर्मूलन व समताधिष्ठीत समाजाची रचना याद्वारे समाज परिवर्तन होणे गरजे आहे. हाच विचार डॉ. सदानंद मोरे यांनी मांडून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराला दुजोरा दिला.

३३. लोंढे प्रभाकर — 'अण्णाभाऊ साठे एक सम्यक आकलन'

प्रकाशन — मराठवाडा साहित्य परिषद, उस्मानाबाद

आवृत्ती — प्रथम — (२००६)

अण्णाभाऊ साठेच्या व्यक्तिीमत्वात असलेले विविध पैलू डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा विचार अण्णाभाऊच्या लेखनीत कसा साकरला. हा उपयुक्त विचार मांडला आहे.

३४. वाघमारे गंगाधर — 'स्वराज्यासाठी बहुजनांचे बलिदान'

प्रकाशन — मराठवाडा साहित्य परिषद, उस्मानाबाद

आवृत्ती — प्रथम १ऑगस्ट २००६

सदर ग्रंथात स्वातंत्र्यपूर्व काळाच्या हजारो वर्षापासून या देशातील बहुजन समाज अत्यंत क्रांतीकारी, शूरवीर, लढवय्य आणि राज्यकर्ता होऊन गेला. त्याचा खरा इतिहास, क्रांतीकार्य या पुस्तकातून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

३५. वाघमारे जनार्दन — 'समाज परिवर्तनाच्या दिशा'

प्रकाशन — साकेत प्रकाशन, औरंगाबाद

आवृत्ती — पहिली १ जानेवारी १९९५

राजकीय लोकशाहीपेक्षा सामाजिक लोकशाही खूप महत्वाची आहे. सामाजिक लोकशाही म्हणजे स्वातंत्र्य समता, सामाजिक न्याय व बंधूता ही जाणिवाची मूलभूत तत्वे मान्य करणारी पध्दती आहे. या तत्वाना वेगळे करू शकत नाही. भारत खरे खुरे राष्ट्र व्हावयाचे असेल तर जाती भेद गाडावा लागेल. हजारो जातीत विभागलेल्या समाजातून एकसंघ राष्ट्र कसा निर्माण होईल ? असा विचार प्रकट केलेला आहे.

३६. शेजवळ मिलींद — 'दलितांचे खरे शत्रू'

प्रकाशन — भारतीय जनता पार्टी

वसंतस्मृती, दादर

आवृत्ती — प्रथम ६ डिसेंबर २००६

या पुस्तकात वेळोवेळी लिहिले गेलेल्या प्रासंगिक लेखांचे संकलन केले गेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'कॉंग्रेस हे जळत घर आहे' असे सांगितल्याप्रमाणे या पक्षाने अनेक वर्षे आपली सत्ता टिकवून दलितांना दिवसेंदिवस अधिक अधंकारात ठेवण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न ठेवला आहे. ऐन निवडणूकांच्या तोंडावर लोकांना मूल थापा देवून विशेषत: दलित जनतेची दिशाभूल केलेली आहे. असाच लेखकांना वरील पुस्तकातून सूर लोभत असल्याचे दिसते.

३७. सबनीस श्रीपाल — 'भारतरत्न आणि बहिष्कृत भारत'

प्रकाशन — प्रियदर्शनी प्रकाशन, कोल्हापूर

आवृत्ती — प्रथम जून १९९१

दलितांची नियतकालिकं व पाक्षिक यांनी प्रारंभीच्या काळात स्वमत प्रतिपादन करण्यासठी आणि प्रभावीपणे परत खंडन करण्यासाठी महत्वाची कामगीरी केली होती. त्यामुळे लढाऊपणा व आक्रमकपणा हे गुण त्यात आले. या नियतकालीकावर कशी दुहेरी जबाबदारी होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ही वृत्तपत्र कोणत्या परिस्थितीत चालविले त्याचा सविस्तर कार्यभार वर्णन केला आहे.

३८. सप्रे निलिमा — 'शिक्षण संवेदन'

प्रकाशन — धम्म प्रबोधिनी प्रकाशन, कल्याण, मुंबई

आवृत्ती — प्रथम मे / जून २०११

'सामाजिक कौशल्य' या शिर्षकाखाली डॉ. निलिमा सप्रे यांनी लिहिलेल्या लेखात व्यक्तीला समाजात सुखासमाधानाने जगण्यासाठी सामाजिक कौशल्यांची अत्यंत आवश्यकता आहे आणि ही सामाजिक कौशल्य विकसित होण्यासाठी सामाजिक बुध्दीमत्तेची आवश्यकता आहे. ही बुध्दीमत्ता कौशल्य जन्मत:च काही प्रमाणात प्रत्येक व्यक्तीत असतातच मात्र त्या कौशल्यांचा विकास प्रयत्नपूर्वक करणे आवश्यक आहे. असा विचार मांडला आहे.

३९. **सांळुखे आ.ह. — 'लोकराज्य धम्मचक्र प्रवर्तन सुवर्णमहोत्सव विशेषांक'**

प्रकाशन — माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र शासन

आवृत्ती — प्रथम २००६

'उपेक्षितांच्या आतरकि शक्ती फुलविणारा तथागतांचा धम्म' या लेखात तथागतरंच्या समतेच्या क्रांतीनंतर मनुस्मृतीची विषमता पक्की करणारी प्रतिक्रांती झाली नसती किंवा ती प्रविक्रांती आधुनिक काळात पूर्णांशने निराप्रभ झालेली असती तर हा विषय चर्चेला आलाच नसता. आज सुध्दा विषमतेची व्यवस्था चांगलीच कार्यरत आहे. अशा परिस्थितीत दबलेल्या लोकांना समतेच्या पातळीवर आणून सर्वांगानी कसे फुलवावे हे समजण्यासाठीच सामाजिक इतिहासाचे अवलोकन केले पाहिजे. असा विचार मांडला.

४०. **हेगडे लिलाधर — 'मी आणि माझी शाहिरी'**

प्रकाशन — सुरेश डहाळे

सानेगुरूजी आरोग्य मंदिर

आवृत्ती — प्रथम ५ फेब्रवारी २००६

लेखकांनी आपली शाहिरी व त्याचा मराठा मनावर झालेला परिणाम किती प्रभावी होता त्याचा प्रत्यय व सुप्रसिद्ध लेखक वसंत वापर यांच्याही विचारावर प्रभाव टाकला आहे.

३. प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टये (Objectives of the Research) :-

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टये :—

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेचा शोध घेणे.
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेतील शैक्षणिक मूल्यांचा शोध घेणे.
३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेतील वाङ्मयीन मूल्यांचा शोध घेणे.
४. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेचा समाज मनावर झालेला परिणामांचा अभ्यास करणे.
५. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेतील शैक्षणिक मूल्यांचा सद्य:स्थितीवर झालेल्या परिणामांचा शोध घेणे.
६. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारिता आणि सामान्य पत्रकारिता यातील मुलभूत फरक स्पष्ट करणे.

४. गृहितक /परिकल्पना (Hypothesis)

गृहितक :—

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेतून शैक्षणिक व वाङ्मयीन मूल्यांचा शोध घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेली वैचारिक मूल्ये समाजात रूजविणे.

परिकल्पना :—

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेतील शैक्षणिक मूल्यांचा समाज मनावर झालेला सुपरिणाम आढळून येतो.
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेतील वाङ्मयीन मूल्यांचा समाज मनावर झालेला चांगला परिणाम आढळतो.
३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निरपेक्ष आणि निर्भिड पत्रकारितेचा समाज मनावर ठसा उमटल्याचे आढळते.

आशय मर्यादा :—

या मध्ये फक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेपुरतेच मर्यादित घेतले आहे.

५. संशोधनाची कार्यवाही (Work Plan / Methodology) :-

संशोधनाची पध्दती व कार्यवाही :—

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने ऐतिहासिक पध्दतीचा अवलंब करून दस्तऐवज ही पध्दती निवडली आहे. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वाङ्मय शासनाच्या अधिपत्याखाली असल्यामुळे व शासनाने प्रकाशित केल्यामुळे ते दस्तऐवजाच भाग मानतात. सदरची माहिती बाबासाहेबांच्या दूर्मिळ ग्रंथातून तसेच त्यांच्या अनुयांयाकडून व काही माहिती बाबासाहेबांच्या पश्चात असलेल्या संबधित व्यक्तिकडून प्रत्यक्ष भेटूनच मिळविलेली आहे आणि त्याचे निष्कर्ष प्रकरणांमध्ये मांडलेले आहेत.

६. व्याप्ती आणि मर्यादा (Scope and Limitations) :-

सदर संशोधनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वेगवेगळया विचारांच्या पैलू पैकी बाबासाहेबांनी चालविलेली पत्रकारीतच विचाराधीन घेतली आहे. पत्रकारितेचा कालखंड इ.स. १९२० ते इ.स. १९५६ असा आहे. ही संशोधनाची व्याप्ती व मर्यादा आहे.

७. संदर्भ ग्रंथ (Biblography) :-

- **आगलावे प्र.** (२००१), ‘समाजशास्त्रज्ञ डॉ.बाबासाहेब आंबेडकर’, सुगावा प्रकाशन.

- **आनंद** (२००३, २००४), ‘भगवान बुध्द’, समृध्द भारत प्रकाशन, मुंबई, मराठी आवृत्ती.

- **अहिर डी.सी.** (२००६), ‘लोकराज्य धम्मचक्र प्रवर्तन सुवर्ण महोत्सव विशेषांक’, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र शासन, आवृत्ती प्रथम.

- **कदम अ.** (२००५), ‘सडक नाटक’, प्रकाश विश्वासराम लोक वाङ्मय, मुंबई, आवृत्ती – प्रथम.

- **कहान्डे स.** (२००१), ‘दलितसाहित्य चिकित्सा’, उषा मुलाटे, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती – प्रथम.

- **कांबळे अ.** (१९९२), ‘संपादक – जनता पत्रातील लेख’, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई व मुंबई विद्यापिठ मराठी विभाग, आवृत्ती – प्रथम.

- **कांबळे भि.** (२००४), ‘सम्राट महापरिनिर्वाण विशेषांक’, सम्राट पब्लिकेशन प्रा. लि, दादर, मुंबई, आवृत्ती – प्रथम.

- **कांबळे शां. कृ.** (१९९८), ‘माज्य जल्माची चिन्तरकथा’, उषा वाघ, सुगावा प्रकाशन, पुणे, आवृत्ती – ३री.

- **कांबळे स.** (२०१०), ‘शिक्षण संवेदन’, धम्म प्रबोधिनी प्रकाशन, कल्याण, मुंबई, आवृत्ती – प्रथम.

- **कोनाळे वि. मा.** (२००७), 'चार वांर कापड', महारूद्र मंगनाळे, मुक्तरंग प्रकाशन, लातूर, आवृत्ती – प्रथम.
- **कोळसे पाटील बी.जी** (२००४), 'सम्राट महापरिनिर्वाण विशेषांक', सम्राट पब्लिकेशन्स प्रा. लि., दादर, मुंबई,आवृत्ती – प्रथम.
- **गिमेकर प.** (२००४), 'मराठवाडयातील दलितांचे लोकसाहित्य', के.एस.अतकरे कैलाश पब्लिकेशन्स, आवृत्ती – प्रथम.
- **चंदनशिव सु.,** (२००५), 'मराठी दलित कविता : एक चिकित्सक अभ्यास', सौ. नम्रता मुळे, डिम्पल पब्लिकेशन, ठाणे, आवृत्ती – प्रथम.
- **चढ्ढा स.** (१९९५), 'हिंदी पत्रकारिता सिध्दांत और स्वरूप', तक्षशीला प्रकाशन, दिल्ली, आवृत्ती – प्रथम.
- **जाधव म.** (२००८), 'परिवर्तन', अजिंक्य दादा गोरे, गोदा प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती – प्रथम.
- **ठकार नि.** (२००१) 'साहित्याचे परिघ', सौ. उषा मुलाटे, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती – प्रथम.
- **ढसाळ ना.** (२०१०), 'हाडकी हाडवळ', शब्द पब्लिकेशन, बोरीवली, मुंबई, आवृत्ती – ३ री.
- **दाढेल मा.** (२०१०), 'कारकोदवा', सौ. नम्रता मुळे, डिम्पल पब्लिकेशन, ठाणे, आवृत्ती – प्रथम.
- **देशमुख मा.म.** (१९९६), 'बहुजन समाज आणि परिवर्तन.', सौ.मजुंश्री देशमुख, शिवभारती प्रकाशन, नागपूर, आवृत्ती – प्रथम.
- **पतंग र.** (२००५), 'राज्यघटना आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर', भारतीय विचार साधना प्रकाशन, पुणे, आवृत्ती – प्रथम.
- **पवार ज. वि** (२००४), 'सम्राट महापरिनिर्वाण विशेषांक', सम्राट पब्लिकेशन्स प्रा.लि., दादर, मुंबई, आवृत्ती – प्रथम.

- **पवार सु.** (२००६), 'पत्रकारितेची मूलतत्वे', अनिरूध्द अनंत कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन विजयनगर, पुणे, आवृत्ती – दुसरी
- **पानतावणे ग.** (१९९६), 'पत्रकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर', प्रतिभा प्रकाशन, पुणे, आवृत्ती – दुसरी.
- **बेडेकर दि.के** (२००८), 'निर्मिती व समीक्षा', प्रकाश विश्वासराव, लोकवाङ्मय गृह मुंबई, आवृत्ती – सहावी.
- **बोराडे रा.रं** (१९९२), 'ग्रामीण साहित्य', बाबा मांड, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती – प्रथम
- **मनोहर य.** (१९९२), 'समाज आणि साहित्य समीक्षा', उषा वाघ, सुगावा प्रकाशन, पुणे, आवृत्ती – प्रथम.
- **मुलाटे वा.** (२००५), 'ग्रामीण कथा : स्वरूप आणि विकास', प्रकाशन – सौ. उषा मुलाटे, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती – दुसरी
- **मुणगेकर भा.** (२००६), 'लोकराज्य धम्मचक्र प्रवर्तन सुवर्ण महोत्सव विशेषांक', माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र शासन, आवृत्ती – प्रथम.
- **मून व.** (१९९३), 'फुले आंबेडकर संशोधनातील प्रदुषणे', सुगावा प्रकाशन, पुणे, आवृत्ती – प्रथम.
- **मिस्कीटा ना.** (२००६), 'बाबुराव बागूल यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास', सौ. नम्रता मुळे, डिम्पल पब्लिकेशन, ठाणे, आवृत्ती – प्रथम.
- **मेश्राम के.** (२००५), 'अनाहत', (संपादित), सौ. नम्रता मुळे, डिम्पल पब्लिकेशन, ठाणे, आवृत्ती – प्रथम.
- **मोरे स.** (२००२), 'साप्ताहिक सकाळ', सकाळ पेपर्सचे प्रकाशन, अंक ४८, आवृत्ती – प्रथम.
- **लोंढे प्र.** (२००६), 'अण्णाभाऊ साठे एक सम्यक आकलन', मराठवाडा साहित्य परिषद, उस्मानाबाद, आवृत्ती – प्रथम.

- **वाघमारे गं.** (२००६), ‘स्वराज्यासाठी बहुजनांचे बलिदान’, मराठवाडा साहित्य परिषद, उस्मानाबाद, आवृत्ती – प्रथम.

- **वाघमारे ज.** (१९९५), ‘समाज परिवर्तनाच्या दिशा’, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती – पहिली

- **शेजवळ मि.** (२००६), ‘दलितांचे खरे शत्रू’, भारतीय जनता पार्टी, वसंतस्मृती, दादर, आवृत्ती – प्रथम.

- **सबनीस श्री.** (१९९१), ‘भारतरत्न आणि बहिष्कृत भारत’, प्रियदर्शनी प्रकाशन, कोल्हापूर, आवृत्ती – प्रथम.

- **सप्रे नि.** (२०११), ‘शिक्षण संवेदन’, धम्म प्रबोधिनी प्रकाशन, कल्याण, मुंबई, आवृत्ती – प्रथम.

- **सांळुखे आ.ह.** (२००६), ‘लोकराज्य धम्मचक्र प्रवर्तन सुवर्णमहोत्सव विशेषांक’, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र शासन, आवृत्ती – प्रथम

- **हेगडे लि.** (२००६), ‘मी आणि माझी शाहिरी’, सुरेश डहाळे, सानेगुरूजी आरोग्य मंदिर, आवृत्ती – प्रथम.